


॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

▪ अहिल्यानगर ▪ रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक ३३४ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

**✻ सुविचार ✻**
मोठी व्यक्ती संधी मिळाली नाही
अशी तक्रार कधीच करीत नाही.

## SPOT NEWS

### २०-२२ एप्रिल दरम्यान राज्यात वादळी पावसाची शक्यता

● **मुंबई** – पश्चिम महाराष्ट्र (प्रामुख्याने घाट परिसर), खानदेश, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये २० ते २२ एप्रिल दरम्यान दुपारनंतर काही प्रमाणात आभाळी हवामान आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत विजांचा कडकडाट, पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्याच्या हवामान अंदाजानुसार १९ एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, तसेच उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यातील काही भागांमध्ये दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २० आणि २१ एप्रिल रोजी पावसाच्या क्षेत्रात वाढ होण्याचे संकेत आहेत, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह (पुणे विभाग) मराठवाडा (प्रामुख्याने दक्षिण भाग आणि छत्रपती संभाजीनगर विभाग) आणि विदर्भात (प्रामुख्याने अमरावती विभाग) देखील काही प्रमाणात वादळी पाऊस पडेल. मात्र २२ तारखेला वादळी पावसाच्या क्षेत्रात आणि तीव्रतेत घट होईल.

### अखंड वीजपुरवठ्यासाठी होणार 'एआय'चा वापर

● **मुंबई** – वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची विक्रमी मागणी पूर्ण करतानाच, वीजनिर्मिती आणि पुरवठ्यात कोणताही व्यत्यय येऊ नये यासाठी आता 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा (एआय) आधार घेतला जाणार आहे. ऊर्जेचे नेटके व्यवस्थापन आणि तांत्रिक बिघाडांचा अंदाज घेण्यासाठी 'एआय'चा प्रभावी वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असून, यामुळे राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा नवा अध्याय सुरू होणार आहे. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे शनिवारी आयोजित उन्हाळ्यातील 'पीक डिमांड' आणि वीज वितरण व्यवस्थेच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. उन्हाळ्याचा वाढता तडाखा आणि आगामी पावसाळा या दोन्ही ऋतूंमध्ये वीजपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता असते. ही अडचण दूर करण्यासाठी केवळ पारंपरिक पद्धतींवर अवलंबून न राहता, ऊर्जा विभागाने तंत्रज्ञानाची जोड द्यावी, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. विशेषतः मागणीचा अचूक अंदाज वर्तवणे, देखभाल-दुरुस्तीची कामे नियोजित करणे आणि संभाव्य तांत्रिक धोके ओळखण्यासाठी 'एआय' यंत्रणा महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# महिलांच्या हक्कांसाठी यापुढेही लढत राहणार

## महिला विधेयक नामंजूर झाल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदींची नाराजी

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –
काँग्रेस आणि त्यांच्या सोबतच्या पक्षांनी नारीशक्ती वंदन विधेयकाला विरोध करत महिलांच्या अधिकारांची भ्रूणहत्या केली. ज्या-ज्या पक्षांनी महिलांच्या आरक्षणात अडथळे आणले, त्यांना भविष्यात परिणाम भोगावे लागतील, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. दरम्यान, विधेयकाच्या अपयशासाठी काँग्रेस, द्रमुक, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्षाला जबाबदार धरले आणि हा लढा अजून संपलेला नाही आणि भाजप, एनडीए महिलांच्या हक्कासाठी लढत राहतील, असे मोदी म्हणाले. विधेयक नामंजूर झाल्याने त्यांनी विरोधी पक्षांवर टीकास्त्र सोडले.



महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना संबंधित १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी रात्री देशवासीयांना संबोधित करत आपली भूमिका मांडली. काँग्रेसने इतिहास रचण्याची आणि महिलांच्या बाजूने उभे राहण्याची संधी गमावली, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. आज भलेही हे विधेयक पास करण्यासाठी ६० टक्के बहुमत आमच्याकडे नसेल, परंतु देशातील कोट्यवधी महिलांची आम्हाला साथ आहे. महिलांच्या अधिकारांमध्ये येणाऱ्या प्रत्येक अडचणी आम्ही दूर करू. आमचा विश्वास दृढ आहे. आम्ही फक्त त्या वेळेची वाट पाहत आहोत. काल आमच्याकडे संख्याबळ नाही म्हणजे आमचा पराभव झाला, असे नाही. आमचा प्रयत्न थांबणार नाही. आमच्याकडे पुढे अनेक संधी येतील आणि आम्ही हा संकल्प पूर्ण करू, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

नारीशक्ती वंदन बिल हे प्रत्येकाला काही तरी देणारे होते, कुणाचेही काहीही काढून घेणारे नव्हते. देशातील अर्ध्या लोकसंख्येला त्यांचा अधिकार देण्याचा प्रयत्न होता. मतदारसंघ पुनर्रचना विधेयकामुळे महिलांच्या वाट्याला येणाऱ्या मतदारसंघांमध्ये मोठी वाढ होणार होती. परंतु विरोधी पक्षांनी त्याला विरोध केला. मतदारसंघ पुनर्रचनेवर काँग्रेस आणि टीएमसी, डीएमके, समाजवादी पक्षाने सातत्याने अफवा पसरवल्या. त्यांच्या विरोधामुळे हे होऊ शकले नाही, असेही मोदी म्हणाले.

भारतीय महिलांच्या इच्छांना रोखण्यात आलं, त्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर करण्यात आला. आमच्यासाठी देशहित सर्वात प्रथम आहे. पण काही लोकांसाठी पक्षहित हे सर्वात मोठे होते. त्यावेळी देशातील महिलांना त्याचे परिणाम भोगावे लागतात. यावेळीही असंच काहीतरी झाले. काँग्रेस, समाजवादी, डीएमके यांच्यामुळेही आता असेच घडले.

ज्यावेळी महिलांच्या अधिकारांवर गदा येते, त्यावेळी त्याचा बदला घेतला जाईल. नारीशक्ती वंदन विधेयकाला ज्या लोकांनी विरोध केला, त्यांनी महिलांना गृहीत धरण्याची चूक केली. देशातील महिलांना विरोधकांची भूमिका समजली आहे. त्याचा परिणाम आता भोगावा लागणार आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

### ३० मिनिटांच्या भाषणात ६० वेळा काँग्रेसचे नाव

▪ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज देशाला संबोधित केले. त्यावेळी त्यांच्या चेह-यावर काँग्रेससह विरोधी पक्षांवर किती राग होता, याचा अंदाज आला. त्यांनी आपल्या ३० मिनिटांच्या भाषणात काँग्रेसचा ६० वेळा उल्लेख करून राष्ट्रहिताला विरोध केल्याचा आरोप केला. विविध महत्त्वाच्या विधेयकांना काँग्रेसने विरोध केल्याचे सांगत त्यांनी तीन तलाक आणि समान नागरी कायद्याचाही उल्लेख केला.

## लग्नासाठी दबाव टाकून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तरुणावर पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

● **पाथर्डी । वीरभूमी** –
तालुक्यातील एका एकवीस वर्षीय विद्यार्थिनीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली असून, या प्रकरणी एका तरुणाविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव यज्ञेश वाकळे (रा. ढवळेवाडी) असे असून या घटनेने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित विद्यार्थिनी ही शेवगाव येथील एका महाविद्यालयात एमसीएसच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत होती. कुटुंबीय शेती व्यवसाय करून उदरनिर्वाह करत असून ती शिक्षणासोबत घरच्या जबाबदाऱ्याही सांभाळत होती. दरम्यान पाथर्डी तालुक्यातील ढवळेवाडी येथील यज्ञेश वाळके या युवकाने त्या तरुणीला वारंवार फोन करून तिच्याशी लग्न करण्याचा दबाव टाकत असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या युवकाने संबंधित विद्यार्थिनीचे इतर ठिकाणी ठरलेले लग्न मोडावे यासाठी तिच्या नातेवाईकांनाही फोन करून माझे तिच्यावर प्रेम आहे, तिचे लग्न लावू नका. असे सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकारामुळे विद्यार्थिनी व तिच्या कुटुंबीयांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

दि. १४ एप्रिल २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास संबंधित युवकाचा फोन आला होता. त्यानंतर १६ एप्रिल रोजी सकाळी व पुन्हा सायंकाळी त्याने संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. सायंकाळी सुमारे साडेचार वाजण्याच्या सुमारास विद्यार्थिनीने त्या युवकाशी काही मिनिटे संवाद साधल्याचे समोर आले आहे.

या संभाषणानंतर अल्पावधीतच तिने घरातच विषारी औषध प्राशन केले. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी तिला तातडीने शेवगाव येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी तिला वाचविण्यासाठी प्रयत्न केले. मात्र उपचारादरम्यान १७ एप्रिल २०२६ रोजी पहाटे तरुणींचा मृत्यू झाला.

या प्रकरणी मयत मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी यज्ञेश वाळके (रा. ढवळेवाडी, ता. पाथर्डी) या तरुणाविरुद्ध पाथर्डी पोलिस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आरोपीचा शोध घेतला मात्र तो मिळून आला नाही. पाथर्डी पोलीस घटनेचा अधिक तपास करीत आहेत.

## केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढला

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –
केंद्रीय मंत्रिमंडळाने आज (दि. १८) केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्क्यांनी वाढ करण्यास मंजुरी दिली. प्रस्तावित ८ व्या वेतन आयोगांतर्गत वेतन रचनेत मोठे बदल करण्याच्या कर्मचारी संघटनांच्या मागण्यांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

नॅशनल कॉन्सिल-जॉईंट कन्सल्टेटिव्ह मशिनरीने सरकारला सादर केलेल्या निवेदनात वेतन रचनेत मोठे बदल करण्याची मागणी केली आहे. यात प्रामुख्याने ३.८३ इतक्या उच्च 'फिटमेंट फॅक्टर'ची मागणी आहे; ज्यामुळे किमान मूळ वेतन १८,००० रुपयांवरून वाढून सुमारे ६९,००० रुपयांपर्यंत पोहोचू शकेल. वेतन गणनेसाठी 'कुटुंब' या संज्ञेची व्याप्ती वाढवून त्यात अवलंबून असलेल्या पालकांचा समावेश करण्याचा प्रस्तावही या संघटनेने मांडला आहे. तसेच, वेतनातील तफावतीवर मर्यादा घालण्याची, आणि त्यासोबतच उच्च वेतनवाढ व महागाईशी निगडित भत्ते देण्याची शिफारस केली आहे.

याच बैठकीत केंद्र सरकारने भारतीय जहाजांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. भारतीय ध्वजधारक आणि भारताकडे येणाऱ्या-जाणाऱ्या जहाजांना स्वस्त दरात विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यासाठी १३,००० कोटी रुपयांचा 'सॉवरेन मेरीटाईम फंड' स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

# बसमध्ये महिलेचे दागिने चोरणाऱ्या शेवगाव तालुक्यातील महिलेला अटक

## बोधेगाव येथील सराफाला दिलेले २० तोळे सोने हस्तगत

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –
करजगाव (ता. नेवासा) येथील महिलेच्या बॅगमधील २० तोळ्याचे दागिने चोरणार्या महिलेला कोतवाली पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, चोरीचे सोने घेणार्या सराफाकडून सदरचे २० तोळ्याचे दागिने जप्त करण्यात आले आहे. माया कल्याण भोसले (वय ३६ रा. हातगाव, ता. शेवगाव) असे अटक केलेल्या संशयित आरोपी महिलेचे नाव आहे.

मिनाबाई ज्ञानदेव बडाख (वय ५७, रा. करजगाव, सोनई) यांनी ७ एप्रिल २०२६ रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्या सकाळी वाकडेवाडी (पुणे) एसटी स्थानकावरून आपल्या मूळ गावी जाण्यासाठी बसमध्ये बसल्या होत्या. त्यांच्या बॅगेत सुमारे २० तोळे सोन्याचे दागिने ठेवलेले होते. बस घोडनदी-शिरूर परिसरात आल्यानंतर दोन अनोळखी महिला तोंडाला स्कार्फ बांधून बसमध्ये चढल्या. त्यापैकी एक महिला फिर्यादींच्या शेजारी बसली. काही वेळाने त्या महिला सुपा (ता. पारनेर) परिसरात उतरल्या. पुढे केडगाव येथे पोहोचल्यावर फिर्यादींनी बॅग तपासली असता त्यातील सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचे लक्षात आले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण व सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान माया कल्याण भोसले हिला ताब्यात घेऊन चौकशी केली असता तिने गुन्ह्याची कबुली दिली. चोरी केलेले सोने तिने तिच्या ओळखीच्या सराफ दुकानदार भागवत मधुकर आदापुरे (रा. बोधेगाव, ता. शेवगाव) याच्याकडे दिल्याचे उघड झाले. यानंतर संबंधित सराफ दुकानदारास पोलिसांनी नोटीस देऊन पोलीस ठाण्यात हजर राहण्यास सांगितले असता, त्याने पंचांसमक्ष २५ लाख रूपये किंमतीचे सुमारे २० तोळ्याचे सोन्याचे दागिने पोलिसांच्या ताब्यात दिले.



ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. संभाजी गायकवाड, सपोनि. कुणाल सपकाळे, उपनिरीक्षक गणेश देशमुख, अंमलदार सुनील चव्हाण, दौंड, विशाल दळवी, विनोद बोरगे, राहुल शिंदे, साबीर शेख, रोहिनी दरंदले, दीपक रोहकले, सत्यजित शिंदे, अमोल गाढे, अतुल काजळे, शिरीष तरटे, अतुल कोतकर, राहुल मासाळकर, महेश पवार, रमेश शिंदे, अतुल लाटे, कविता साठे, पल्लवी रोहकले, राहुल गुंडू यांच्या पथकाने केली.

SPOT NEWS



## केडगावच्या ओएसीस स्कूलचा 'सीबीएसई'त डंका

● **अहिल्यानगर । वीरभूमी–** सेंट्रल बोर्ड ऑफ एज्युकेशन (सीबीएसई) द्वारा घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये केडगाव येथील 'ओएसीस इंग्लिश मीडियम स्कूल'ने यशाची परंपरा कायम राखली असून, शाळेच्या विद्यार्थिनींनी यश मिळवले आहे. कु. अन्विता सुहास घिगे हिने ९४ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला. आस्था राहुलकुमार शिंगवी (९३.००%) द्वितीय, तरअक्षरा संजय माळवे (९२.००%) हिने तृतीय क्रमांक पटकावला. आजच्या काळात स्पर्धा परीक्षेसाठी पालकांचा ओढा महागड्या खासगी शिकवणीकडे असतो. मात्र, ओएसीस स्कूलच्या या गुणवंतांनी कुठलीही बाहेरील शिकवणी न लावता, केवळ शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि जिद्दीच्या जोरावर हे घवघवीत यश संपादन केले. त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. निकालाचा मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कु. आस्था शिंगवी हिने इंग्रजी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तर अक्षरा माळवे हिनेही ९९ गुण मिळवत आपले भाषिक प्रभुत्व सिद्ध केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक भानुदास कोतकर, सचिव सचिन कोतकर, संचालिका वैशालीताई कोतकर, प्राचार्या दारकुंडे मॅडम, पर्यवेक्षक शरद पवार आणि सर्व शिक्षक वृंदांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## भाऊसाहेब फिरोदियामध्ये अकरावी ऑनलाइन प्रवेश फॉर्म भरण्याची सुविधा

● **अहिल्यानगर । वीरभूमी–** भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये इयत्ता अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात मोफत उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी दिली. ज्या विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिलेली आहे, अशा विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी मध्ये प्रवेश घेण्यासाठी गतवर्षीपासून पूर्णपणे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवायला सुरुवात झालेली आहे. गतवर्षी विद्यार्थ्यांचा मोठा गोंधळ उडाल्याने अनेक विद्यार्थ्यांना त्याचा त्रास झाला आणि पालकांना आर्थिक झळ बसली होती. यामुळेच या वेळेला शासनाकडून ही प्रक्रिया लवकर सुरू करण्यात आलेली आहे. असे असले तरी विद्यार्थ्यांना या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये अनंत अडचणी येतात त्यांच्याकडून चुका होतात, आणि चुकीचे फॉर्म भरल्यामुळे पुढे प्रवेशासही अडचण निर्माण होते. या सगळ्या गोष्टी टाळण्यासाठी संस्थेच्यावतीने पुढाकार घेऊन सर्व विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सेवा तसेच मोफत समुपदेशन उपलब्ध करून देण्यात आलेले असल्याची माहिती प्राचार्य उल्हास दुगड यांनी दिली. या ऑनलाइन प्रवेशामध्ये सुरुवातीला विद्यार्थ्यांचा भाग १ भरावयाचा असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे सकाळी १० ते ४ या वेळेत उपस्थित रहावे तसेच अधिक माहितीसाठी ९३२५१०९८२९ व ९०९६२४४१७८ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन उच्च माध्यमिक विभागाचे विभाग प्रमुख राजेंद्र जाधव यांनी केले आहे.

# आ. काळेंच्या पाठपुराव्याने संवत्सर पुलाच्या दुरुस्तीला सुरुवात

### मुंबई-नागपूर महामार्गावरील वाहतूक लवकरच सुरळीत होणार । नागरिक व वाहनचालकांना दिलासा

● **कोपरगाव । वीरभूमी –** कोपरगाव – दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या जुन्या मुंबई-नागपूर महामार्गावरील संवत्सर येथील गोदावरी नदीवरील पुलाला मध्यभागी भगदाड पडल्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव या पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली होती. त्यामुळे या मार्गावरील वाहतुकीला मोठा फटका बसला होता.

या पार्श्वभूमीवर आमदार आशुतोष काळे यांनी मागील महिन्यात १८ मार्च रोजी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते विकास व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन पुलाच्या तातडीच्या दुरुस्तीची मागणी केली होती. या पाठपुराव्याला यश आले असून संवत्सर पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाल्याची माहिती आमदार काळे यांनी दिली.

वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा पूल राज्यातील प्रमुख शहरांना जोडणाऱ्या जुन्या मुंबई-नागपूर महामार्गावर आहे. पुलावर काही ठिकाणी खड्डे पडल्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. परिणामी, मागील काही महिन्यांपासून या पुलावरील सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली होती.



दरम्यान, अहिल्यानगर ते सावळीविहिर महामार्गाचे काम सुरू असल्यामुळे धुळे-मालेगाव-मनमाड-येवला मार्गे कोपरगावकडे येणारी वाहतूक पुणतांबा फाट्यावरून वळवून वैजापूर मार्गे या महामार्गावर सोडण्यात आली होती. त्यामुळे या मार्गावर वाहतुकीचा मोठा ताण वाढला होता. पुल बंद झाल्याने कोपरगाववरून वैजापूर व छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

ही समस्या लक्षात घेऊन आमदार काळे यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करून पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली होती. त्यानुसार दुरुस्तीचे आदेश देण्यात आले असून काम सुरू झाले आहे. दुरुस्ती पूर्ण होताच हा पूल पुन्हा वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असून वाहतूक पूर्ववत सुरू होईल, असे त्यांनी सांगितले.

संवत्सर पुलाच्या दुरुस्तीमुळे वाहनचालकांसह नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, पुल बंद असल्यामुळे महामार्गालगतच्या कोपरगाव तालुक्यातील अनेक गावांतील छोट्या-मोठ्या व्यावसायिकांवरही परिणाम झाला होता. आता वाहतूक सुरळीत झाल्यानंतर व्यवसाय पुन्हा पूर्वपदावर येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

कोकमठाण, संवत्सर, दहेगाव बोलका, लौकी-गोधेगाव, तळेगाव तसेच वैजापूर तालुक्यातील व्यावसायिकांनी पुलाच्या दुरुस्तीला सुरुवात झाल्याबद्दल आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले आहेत.

### एका महिन्याच्या आत दुरुस्तीला सुरुवात

■ संवत्सर पुलाच्या दुरुस्तीबाबत आमदार आशुतोष काळे यांनी १८ मार्च रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली होती. अवघ्या एका महिन्याच्या आत दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाल्याने त्यांच्या पाठपुराव्याचे कौतुक होत आहे. जनतेची कामे तातडीने मार्गी लावण्याची त्यांची कार्यपद्धती अधोरेखित झाली आहे.

## नगरमध्ये २८ एप्रिल रोजी निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय मेळावा

### तथागत बुध्दिस्ट सोसायटी इंडियाचा उपक्रम

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** तथागत बुध्दिस्ट सोसायटी इंडियाच्या वतीने शहरात मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील युवक-युवतींना योग्य जोडीदार मिळावा आणि विवाह प्रक्रियेला सुलभता यावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय कांबळे व वधू-वर समिती प्रमुख अशोक बागुल यांनी केले आहे.

हा वधू-वर परिचय मेळावा न्यू टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आयोजित करण्यात आला आहे. दुपारी १ वाजता उद्घाटन सत्रानंतर वधू-वर परिचय मेळाव्याला प्रारंभ होणार असून त्यामध्ये सहभागी युवक-युवतींना एकमेकांची ओळख करून देण्यात येणार आहे.

या मेळाव्यात बौद्ध समाजातील अविवाहित युवक-युवतींसह घटस्फोटीत तसेच विधुर व्यक्तींचीही नोंदणी केली जाणार आहे.

विवाहासाठी इच्छुक असलेल्या कुटुंबांना एकाच ठिकाणी एकमेकांची माहिती मिळावी आणि संवाद साधता यावा, यासाठी हा मेळावा उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

सहभागी होणाऱ्या युवक-युवतींच्या पालकांनी आपल्या मुला-मुलींचा बायोडाटा व फोटो सोबत घेऊन उपस्थित राहावे, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे. तसेच मेळाव्याबाबत अधिक माहिती किंवा नोंदणीसाठी संजय कांबळे (मो. ९९७०७७५५२२) व अशोक बागुल (मो. ९८८१८२७८९२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## बॅकबेंचर्सही गाठू शकतात यशाची शिखरे

### आत्माराम झरेकर । चापडगाव विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा गुणगौरव

● **शेवगाव । वीरभूमी–** जीवनात यशस्वी होण्यासाठी शिक्षकांचा आदर, सन्मान आणि त्यांनी दिलेल्या शिकवणीचे प्रामाणिकपणे अनुकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी नेहमीच पहिल्या बाकावर बसून शिक्षण घेणे गरजेचे नसते; बॅकबेंचर्सदेखील उच्च पदावर जाऊ शकतात, असे प्रतिपादन आत्माराम झरेकर यांनी केले.



शेवगाव तालुक्यातील चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित माजी विद्यार्थ्यांच्या गुणगौरव कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका अंजली चिंतामण या होत्या.

यावेळी व्यासपीठावर पर्यवेक्षक अनिल मगर, अशोक आघवणे, दादासाहेब ज्योतीक, संजय मरकड, शितल गोरे, वत्सला जाधव, विद्यावर्धिनी मुळे, शितल दहिवाळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान रामेश्वर आंधळे, योगेश पोपळे आणि सत्यवान तेलोरे यांची नुकतीच पोलीस दलात निवड झाल्याने त्यांचा विद्यालयातर्फे सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांनी आपल्या मनोगतात यशाच्या प्रवासातील अनुभव सांगितले. आम्ही अभ्यासात फार हुशार नव्हतो, पण खेळाची प्रचंड आवड होती. आमच्या जडणघडणीत अंजली चिंतामण, आत्माराम झरेकर आणि विद्यावर्धिनी मुळे या शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे, असे त्यांनी नमूद केले.

उपमुख्याध्यापिका अंजली चिंतामण आणि शिक्षिका विद्यावर्धिनी मुळे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच, अशा यशस्वी विद्यार्थ्यांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय दुधाडे यांनी केले, तर सुभाष बर्डे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले.

# महिला ही समाजाचा आधारस्तंभ तिला योग्य सन्मान मिळावा

### सरपंच विमलताई झावरे । वासुंदे ग्रामपंचायतीत महिला सक्षमीकरण मार्गदर्शन शिबिर उत्साहात

● **पारनेर । वीरभूमी–** महिला ही समाजाचा खऱ्या अर्थाने आधारस्तंभ असून तिला समाजात योग्य सन्मान मिळणे ही काळाची गरज आहे. महिला सक्षमीकरण ही केवळ संकल्पना न राहता ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन वासुंदे ग्रामपंचायतीच्या सरपंच विमलताई झावरे यांनी केले.

वासुंदे ग्रामपंचायत अंतर्गत महिला सक्षमीकरणासाठी आयोजित विशेष मार्गदर्शन शिबिर शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ रोजी उत्साहात पार पडले. शिबिराचे उद्घाटन सरपंच विमलताई झावरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास वासुंदे येथील महिला, अंगणवाडी सेविका, वैद्यकीय मदतनीस तसेच पारनेर येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. शिबिरात महिलांच्या दैनंदिन जीवनातील विविध प्रश्न व समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमात रूपवर्षा भालेराव, प्रियांका भामरे, पार्वती कारंडे, सुप्रिया गोरे, करिष्मा शेख, अपेक्षा जऱ्हाड, अश्विनी रोहकले यांच्यासह वासुंदे परिसरातील अनेक महिला व युवती सहभागी झाल्या.

समारोपावेळी बोलताना सरपंच विमलताई झावरे म्हणाल्या की, आजची स्त्री घर सांभाळण्याबरोबरच सामाजिक जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत आहे. महिलांना सक्षम बनवण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे ग्रामपंचायतीचे कर्तव्य आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आगामी काळातही विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातील, असे त्यांनी सांगितले. तसेच, महिला आर्थिक व वैचारिकदृष्ट्या सक्षम झाल्याशिवाय समाजाची खरी प्रगती होणार नाही, असा विश्वास सरपंच विमलताई झावरे यांनी व्यक्त केला.




### ग्रामपंचायतीचे उपक्रम आणि सामाजिक बांधिलकी

■ वासुंदे ग्रामपंचायत दरम्हा महिलांसाठी माजी जिल्हा परिषद सदस्या सुप्रियाताई झावरे व सुजितराव झावरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिरे आयोजित करते. महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्या स्वावलंबी व्हाव्यात, हा यामागील उद्देश आहे. सरपंच विमलताई झावरे गेल्या अनेक वर्षांपासून महिलांच्या उन्नतीसाठी कार्यरत असून त्यांच्या कार्याचे परिसरात कौतुक होत आहे.

SPOT NEWS



## धर्मवीर संभाजी महाराजांच्या बलिदान दिनानिमित्त आदरांजली

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त सावेडी येथील धर्मवीर चौक (प्रोफेसर चौक) येथे भवानी मराठा महिला ग्रुपतर्फे महाराजांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रुपच्या अध्यक्षा माधवी दांगट यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी प्रियांका म्हस्के, निलिमा म्हस्के, सुजाता पायमोडे, मनीषा भोसले, सुरेखाताई सांगळे, बापू ठाणगे, दत्ता वामन, प्रतिभा कदम, अमृता वाकळे, पूजा पवार, शैला बेल्हेकर, सारिका जाधव यांच्यासह अनेक महिला सदस्य उपस्थित होत्या. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मनिष्ठेचा गौरव करत त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. या दिवशी छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिन अमावास्येला साजरा केला जातो. त्यामुळे दर अमावास्येला छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली वाहिली जाते ही परंपरा जपली जात आहे. धर्मवीर चौक (प्रोफेसर चौक) येथे अधिकाधिक नागरिकांनी अशा कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन धर्मवीर संभाजी महाराजांना आदरांजली वाहावी तसेच ग्रुपच्या अध्यक्षा माधवी दांगट म्हणाले की, महिलांना स्वतःचे रक्षण करण्यासाठी लाठी, काठी आणि दंड साखळी चे लवकरच शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

## शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवनगौरव पुरस्कार सोहळा २१ एप्रिलला

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

स्व. माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा प्रतिष्ठेचा शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवनगौरव पुरस्कार यावर्षी स्व. शिक्षण महर्षी मधुराजे मुळे तथा आबा यांच्या सातव्या पुण्यतिथी निमित्त मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी प्रदान करण्यात येणार आहे. याच दिवशी प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा देखील आयोजित करण्यात आली असून, हा संयुक्त कार्यक्रम दुपारी ३.०० वाजता कायनेटिक चौक येथील यश ग्रॅण्ड हॉटेल येथे पार पडणार आहे. यावर्षीचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिका तथा महिला बँकेच्या संस्थापिका मा. प्रा. मेधाताई यशवंतराव काळे यांना प्रदान करण्यात येणार असून, त्यांच्या साहित्यिक आणि महिला सक्षमीकरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा यावेळी गौरव केला जाणार आहे. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे भूषविणार आहेत. तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षणप्रेमी, साहित्यिक व समाजबांधव यांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार आहे.

# जिल्ह्यात बालविवाहाविरोधात प्रशासनाची मोठी कारवाई

### वर्षभरात १५५ प्रकरणांमध्ये हस्तक्षेप, ७ गुन्हे दाखल

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

बालविवाहासारख्या सामाजिक कुप्रथेला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाने एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत व्यापक कारवाई करत १५५ प्रकरणांमध्ये हस्तक्षेप केला असून, त्यापैकी ७ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी दिली.

मुलीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि मुलाचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असल्यास तो विवाह कायद्याने दंडनीय ठरतो. अशा बालविवाहांना प्रतिबंध करण्यासाठी प्रशासनाकडून विविध स्तरांवर कारवाई करण्यात येत असून, काही प्रकरणांमध्ये विवाह थांबवून पालकांकडून लेखी हमीपत्र घेण्यात आले आहे, तर आवश्यकतेनुसार पीडित बालिकांना बालगृहांमध्ये संरक्षण देण्यात आले आहे.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये प्रशासन, महिला व बालविकास विभाग, पोलीस यंत्रणा तसेच स्थानिक बालसंरक्षण समित्यांच्या समन्वयातून ही कारवाई राबविण्यात आली आहे. अहिल्यानगर व पाथर्डी येथे प्रत्येकी १९, श्रीगोंदा १७, शेवगाव १५, कर्जत १४, राहुरी १२, नेवासा ११, संगमनेर, पारनेर व राहाता येथे प्रत्येकी ९, कोपरगाव ७, जामखेड व अकोले येथे प्रत्येकी ६, तर श्रीरामपूर येथे २ प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत.

बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार बालविवाह लावणे हा गंभीर गुन्हा असून अशा प्रकरणांत केवळ पालकांवरच नव्हे, तर विवाह सोहळा आयोजित करणारे, मध्यस्थ, नातेवाईक, मंडप-डेकोरेशन व्यावसायिक, बॅण्डपथक तसेच संबंधित सेवा पुरवठादारांवरही कारवाई केली जाते.

बालविवाहामुळे मुलींच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि भविष्यातील संधींवर गंभीर परिणाम होतात. त्यामुळे हा केवळ सामाजिक प्रश्न नसून मुलींच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विषय आहे. यासाठी गावपातळीवर जनजागृती,



शाळांमधील मार्गदर्शन आणि संशयास्पद घटनांवर तात्काळ प्रतिसाद देण्यात येत आहे. ग्राम बाल संरक्षण समित्यांमध्ये अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्ती, पोलीस पाटील, शिक्षक आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांवर विशेष जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

बालविवाहाची माहिती मिळताच चाईल्ड हेल्पलाईनवर कळविल्यास संबंधित यंत्रणा त्वरित सक्रिय होते. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बालसंरक्षण कक्ष, पोलीस अधिकारी आणि स्थानिक यंत्रणा यांच्या संयुक्त पथकाद्वारे घटनास्थळी जाऊन बालविवाह रोखला जातो. त्यानंतर संबंधित बालक व पालकांचे समुपदेशन करून पुनर्वसनाची कार्यवाही केली जाते.

### बालविवाहा संदर्भात येथे संपर्क साधावा

■ येत्या १९ एप्रिल रोजी येणारी अक्षयतृतीया तसेच लग्नसराईच्या हंगामात बालविवाहाचे प्रमाण वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासन अधिक सतर्क झाले आहे. बालविवाहा संदर्भात कोणतीही माहिती मिळाल्यास चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा ११२ या क्रमांकावर कळवावे, असे आवाहन करण्यात आले असून माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवली जाते.

## बोधिसत्व प्रतिष्ठान आयोजित भीम गीतांनी पंचशील नगर दुमदुमले

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त देशभरात तसेच विदेशात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याच अनुषंगाने भिंगार शहरातही जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

पंचशील नगर येथे बोधिसत्व प्रतिष्ठानच्या वतीने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे व विशाल चव्हाण यांच्या भव्य भीम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून बौद्ध वंदना घेण्यात आली. त्यानंतर भिंगार शहराचा बुलंद आवाज म्हणून ओळखले जाणारे कालकथित पँथर एकनाथ उर्फ नाथा भिंगारदिवे यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर भीम गीतांच्या कार्यक्रमास सुरुवात होताच वातावरण भारावून गेले. विविध गाजलेल्या गीतांनी पंचशील नगरसह संपूर्ण भिंगार परिसर दुमदुमून गेला. संपूर्ण वातावरण भिममय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

कार्यक्रमाला ज्येष्ठ कार्यकर्ते प्रसाद भिंगारदिवे, सुदर्शन भिंगारदिवे, सुनील भिंगारदिवे, प्रा. सुहास धिवर, ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, नगरसेवक सुरेशभाऊ बनसोडे, प्रा. जयंत गायकवाड, देशस्तंभ न्यूजचे महेश भोसले, नगरसेवक मयूर बांगरे, आरपीआयचे शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुमेध गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाचे सिद्धार्थ आढाव, अक्षय भिंगारदिवे, संदीप पारधे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बोधिसत्व प्रतिष्ठान पंचशील नगरचे अध्यक्ष आशिष भिंगारदिवे, उपाध्यक्ष सोनू थोरात, कार्याध्यक्ष अजिंक्य भिंगारदिवे, सचिव पंकज शेलकर, खजिनदार अजय शिंदे तसेच रामदास भिंगारदिवे, संतोष धिवर, संदीप थोरात, सनथ भिंगारदिवे, मयूर भिंगारदिवे, विकी बोरगे, अनिरुद्ध भिंगारदिवे, प्रज्वल पवार, निकेतन शिरसाट, भाग्येश बोराडे, किरण गायकवाड, सुमीत भिंगारदिवे, श्रेयस गायकवाड, हर्षल गायकवाड, यश गायकवाड, सोमनाथ भिंगारदिवे, रुतीक धिवर, आदित्य गजभिव, शुभम मिसाळ, रोहन सदाफुले, शिवम वावरे, योगेश आंग्रे, सोहम उबाळे, रोहन उबाळे, सार्थक धिवर, आदित्य कदम, उत्कर्ष धिवर आदींनी परिश्रम घेतले.

## ओव्हरलोड कंटेनरच्या धडकेत स्वागत कमान कोसळली

### माणिकदौंडीत दोन-तीन घरांचे नुकसान; सुदैवाने जिवितहानी टळली



**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील माणिकदौंडी येथे चालकाच्या हलगर्जीपणामुळे संतापजनक घटना घडली. महामानवाच्या जयंतीनिमित्त उत्साहात उभारण्यात आलेली स्वागत कमान ओव्हरलोड कंटेनरच्या धडकेने जमीनदोस्त झाली. या अपघातात स्थानिक नागरिक केशव थोरात व इतर दोन-तीन घरांचेही मोठे नुकसान झाले असून सुदैवाने जिवितहानी टळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिण्याच्या पाणीपुरवठा योजनेसाठी महाकाय पाईप घेऊन एनएल-०१ एल-८७१८ क्रमांकाचा कंटेनर माणिकदौंडीकडून धामणगावच्या दिशेने जात होता. दरम्यान, चालकाने अचानक वाहन मागे घेण्याचा प्रयत्न केला. कंटेनर ओव्हरलोड असल्याने मागे वळवताना चालकाचा अंदाज चुकला. कंटेनरची मागील बाजू आणि त्यावरील अवजड पाईपचा जोरदार धक्का स्वागत कमानीला बसला.

दगडी पिलर व आरसीसी बांधकाम असलेली कमान क्षणात कोसळली. या धक्क्यामुळे कमानीलगत असलेल्या केशव थोरात यांच्या घराचे मोठे नुकसान झाले. काही दिवसांपूर्वीच ही कमान आकर्षक पद्धतीने सजवण्यात आली होती. मात्र चालकाच्या निष्काळजीपणामुळे ती कोसळल्याने ग्रामस्थांच्या भावना दुखावल्या गेल्या.

घटनेनंतर काही वेळातच परिसरात मोठी गर्दी जमली. तणावपूर्ण परिस्थिती लक्षात घेऊन पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी तातडीने फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली.

या घटनेमुळे माणिकदौंडी परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, ओव्हरलोड वाहतूक व चालकाच्या निष्काळजीपणावर कारवाई करावी तसेच नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# ‘जलसंपदा आपल्या दारी’ उपक्रमातून शेतकऱ्यांशी थेट संवाद !

### अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जावून जागेवर केले तक्रारींचे निराकरण

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२६’ अंतर्गत जलसंपदा विभागाच्या वतीने संगमनेर, अकोले, चितळवेढे व पाथर्डी परिसरात ‘शेतकरी व पाणी वापर संस्था संवाद’ उपक्रम राबविण्यात आला. ‘जलसंपदा आपल्या दारी’ या संकल्पनेतून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व तक्रारींचे जागेवर निराकरण केले.

पुनर्वसन उपविभाग व ऊर्ध्व प्रवरा धरण उपविभाग, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने दिगंबर पिंपळगाव नाकविंदा उपसा सिंचन योजनेतील लाभधारक शेतकरी व पाणी वापर संस्थांच्या संचालक मंडळाशी संवाद साधण्यात आला. तसेच ऊर्ध्व प्रवरा उजव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील पिंपरणे, देवगाव, हिवरगाव पावसा व जाखुरी या गावांमध्ये ग्रामस्थांशी संवाद साधून जलव्यवस्थापनाच्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली.

पिंपरणे येथील विविध कार्यकारी सोसायटी व विठाई कृषी सेवा केंद्रात शेतकऱ्यांना कृती पंधरवड्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये जलजागृती करत पाणी संवर्धनाचे धडे देण्यात आले.

ऊर्ध्व प्रवरा धरण उपविभाग क्रमांक एक, अकोले यांच्या वतीने धुमाळवाडी व कळस येथे शेतकरी संवाद मोहीम राबविण्यात आली. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी ऐकून घेत त्यावर तातडीने उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. चितळवेढे येथील उपविभाग क्रमांक दोन अंतर्गत उजव्या कालव्याच्या किलोमीटर ८५ ते ९२.५१ लाभक्षेत्रातील कनगर व चिंचविहिरे येथे बैठका घेऊन बंदिस्त नलिका वितरण प्रणालीसंदर्भातील अडचणींवर चर्चा करण्यात आली.

पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार सिंचन शाखेतही विविध उपक्रम राबविण्यात आले. घाटशिळ पारगाव येथील संत वामन भाऊ पाणी वापर संस्था व घाटशिळादेवी पाणी वापर संस्था यांच्या पदाधिकाऱ्यांशी व शेतकऱ्यांशी संवाद साधत पाणी बचत, ठिबक सिंचनाचा वापर व वेळेवर पाणीपट्टी भरण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या समारोपावेळी कर्मचारी, पदाधिकारी व शेतकऱ्यांनी ‘जलप्रतिज्ञा’ घेत पाणी बचतीसाठी संकल्प केला. सिंचन व्यवस्थापनातून वैयक्तिक पातळीवर प्रयत्न करण्याचा परिसराच्या समृद्धीकडे वाटचाल करण्याचे आवाहन करत उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# महापुरुषांच्या विचारांचा संगम म्हणजे समताधिष्ठित समाजरचना

## मंत्री छगन भुजबळ | शिव-फुले-आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर | वीरभूमी –** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची संकल्पना रुजवून जनतेला स्वाभिमान दिला. महात्मा फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करण्यासाठी आयुष्य वेचले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेद्वारे समानता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांची भक्कम पायाभरणी केली. या तिन्ही महापुरुषांच्या विचारांचा संगम म्हणजे समताधिष्ठित समाजरचना असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

जामखेड येथे आयोजित शिव–फुले–आंबेडकर संयुक्त जयंती उत्सवाच्या कार्यक्रमात मंत्री श्री. भुजबळ बोलत होते. कार्यक्रमास विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आमदार काशिनाथ दाते, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी आमदार भीमराव धोंडे, नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, संध्या सोनवणे, गायक उत्कर्ष शिंदे आदी उपस्थित होते.

मंत्री छगन भुजबळ म्हणाले , छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अत्यंत उत्तुंग आणि प्रेरणादायी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यक्रांती घडवून आणत सर्व जाती–धर्मातील मावळ्यांना एकत्र करून सुराज्याची मुहूर्तमेढ रोवली. शेतकऱ्यांना आधार देत न्यायप्रिय आणि लोककल्याणकारी राज्यकारभार केला. अन्यायाविरुद्ध त्यांनी आयुष्यभर लढा दिला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजक्रांती घडवून शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करण्यासाठी आयुष्य वेचले. बहुजनांसाठी शिक्षणाची दारे खुली करून सामाजिक परिवर्तनाचा पाया रचला. त्यांच्या द्विशताब्दी वर्षाचे औचित्य साधून संपूर्ण देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या आयुष्यात ३२ पदव्या प्राप्त करून ज्ञानाची उंची गाठली. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून समाजातील दीन, दलित आणि शोषित घटकांच्या हक्कांचे संरक्षण करत प्रत्येक नागरिकाला समान अधिकार बहाल केले. मतदानाचा अधिकार देत लोकशाही अधिक मजबूत केली आणि देशाला विकासाच्या दिशेने नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. आपला महाराष्ट्र हा याच महापुरुषांच्या विचारांवर आधारित असून सर्वांना एकत्र घेऊन प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे मंत्री भुजबळ यांनी सांगितले.

नव्या पिढीने महापुरुषांच्या विचारांचा अभ्यास करून समाज परिवर्तनात सक्रिय सहभाग घ्यावा – सभापती प्रा. राम शिंदे

सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचे सुशासन, महात्मा फुले यांचे शिक्षणविस्ताराचे कार्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्वज्ञान आजही तितकेच मार्गदर्शक आहे. नव्या पिढीने या महान विचारांचा अभ्यास करून समाज परिवर्तनात सक्रिय सहभाग घ्यावा. अशा उत्सवांमधून सकारात्मक आणि



प्रेरणादायी विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचत असल्याचे ते म्हणाले.

यावेळी आमदार काशिनाथ दाते, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचीही समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संध्या सोनवणे यांनी केले.

या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेसही पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

## सिस्पे इन्फिनिटी बिकन प्रकरणात न्यायासाठी बेमुदत आमरण उपोषण; उपोषणाचा चौथा दिवस

**अहिल्यानगर | वीरभूमी –** सिस्पे इन्फिनिटी बिकन या आर्थिक फसवणूक प्रकरणात न्याय मिळावा, तसेच पोलीस तपासातील कथित अकार्यक्षमतेविरोधात ठेवीदारांनी सुरू केलेले बेमुदत आमरण उपोषण चौथ्या दिवशीही सुरूच असून प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस दखल घेतलेली नाही.



गेल्या आठ महिन्यांपासून या प्रकरणात न्यायालयीन तसेच आंदोलनात्मक पातळीवर लढा सुरू असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले. मात्र, पोलीस प्रशासनाकडून अद्यापही मूलभूत मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये कंपनीचे संचालक अगस्ती मिश्रा, नवनाथ जगन्नाथ अवताडे, विनोद बबन गाडीलकर, विक्रम बबन गाडीलकर आणि संदीप संपत दरेकर यांना तात्काळ अटक करण्याची मागणी आहे. तसेच अटकपूर्व जामीन अर्ज दाखल करून जाणीवपूर्वक अटकेपासून संरक्षण मिळवणाऱ्यांवर कारवाई करावी, शुभम अवताडे व सुवर्णा अवताडे यांचे जामीन अर्ज फेटाळण्यात आले असतानाही त्यांना अटक का करण्यात आलेली नाही, याबाबत प्रशासनाने स्पष्टीकरण द्यावे, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. याशिवाय, एलएलपी स्वरूपात नोंदणीकृत संबंधित कंपन्यांच्या संचालकांनाही अटक करण्यात यावी, आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे तपासादरम्यान जप्त करण्यात आलेली रक्कम तात्काळ पीडित गुंतवणूकदारांना परत करण्यात यावी, तसेच गुंतवणूकदारांच्या वतीने न्यायालयीन कामकाज पाहणारे ॲड. शुभम साके यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशीही मागणी आहे. या उपोषणात बाबा आप्पा दराडे, अनिल सुभाष तरटे, गोवर्धन गोरक्षनाथ मगर यांच्यासह मोठ्या संख्येने ठेवीदार सहभागी झाले आहेत.

## संजीवनी इंटरनॅशनल स्कूलचा सीबीएसई दहावीचा १०० टक्के निकाल

### स्वरीत भळगाटीयाचा ९७.२० टक्क्यांसह प्रथम क्रमांक | अनेक विद्यार्थ्यांचे शतकी गुण

**कोपरगाव | वीरभूमी –** संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित शिर्डी येथील संजीवनी इंटरनॅशनल स्कूलचा इयत्ता दहावीच्या सीबीएसई परीक्षेत १०० टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेत स्वरीत भूषण भळगाटीयाने ९७.२० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. त्याने सोशल सायन्स विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत आपल्या गुणवत्तेची झलक दाखवली.

सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (सीबीएसई) तर्फे फेब्रुवारी व मार्च २०२६ मध्ये ही परीक्षा घेण्यात आली होती. संजीवनी इंटरनॅशनल स्कूलने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच इतर क्षेत्रांतही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.



या परीक्षेत साची विरेश अग्रवाल हिने ९६ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला. तिने इंग्रजी व इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळविले. जुई अजित पाटील हिने ९४.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

दर्श पवन भुतडा व पृथ्वीराज माळवदे यांनी अनुक्रमे ९४ व ९३.६० टक्के गुण मिळवून चौथा व पाचवा क्रमांक मिळवला. दर्श भुतडा याने इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत तंत्रज्ञान क्षेत्रातील आपली क्षमता सिद्ध केली.

केवळ गुणपत्रिकेवरील गुण आजच्या स्पर्धात्मक युगात पुरेसे ठरत नाहीत, तर यशस्वी होण्यासाठी विविध कौशल्ये, सकारात्मक मूल्ये आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास अत्यावश्यक ठरतो. याच दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव रुजविण्यासाठी शाळेत विविध उपक्रम सातत्याने राबविले जातात. परिणामी, विद्यार्थी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर इतर क्षेत्रांतही राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संजीवनीचे अध्यक्ष नितीन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे तसेच संजीवनी ग्रुप ऑफ स्कूलच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

या सर्व विद्यार्थ्यांना हेड ऑफ अकॅडमिक गव्हर्नन्स डॉ. रावसाहेब शेंडगे, डायरेक्टर ऑफ स्कूल ऑडिट सुंदरी सुब्रमण्यम आणि प्राचार्या शैला झुंजारराव यांचे मार्गदर्शन लाभले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवाड्यात

# ‘स्वच्छ सुंदर माझे कार्यालय’ उपक्रमात स्वच्छता मोहिम

**अहिल्यानगर | वीरभूमी–** शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत सुरू असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२६ अंतर्गत आज ‘स्वच्छ सुंदर माझे कार्यालय, जलपुनर्भरण अभियान’ हा उपक्रम अहिल्यानगर मध्यम प्रकल्प विभाग कार्यालय व सिंचन भवन परिसरात उत्साहात राबविण्यात आला. सकाळी १० ते दुपारी १२.३० या वेळेत पार पडलेल्या या मोहिमेची सुरुवात कार्यकारी अभियंता ज. म. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.

या पंधरवाड्याचा कालावधी दि. १५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ असा असून जलसंपदा विभागाच्या नियोजनानुसार विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याअंतर्गत कार्यालय परिसर स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे व जलसंवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

अभियानादरम्यान जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यालय परिसरासह अंतर्गत विभाग व वसाहतींमध्ये स्वच्छता मोहीम राबवून स्वच्छतेचा संदेश दिला.

कार्यकारी अभियंता यांच्या अखत्यारीतील ताजनापूर मध्यम प्रकल्प बांधकाम उपविभाग क्र. १ व २, शेवगाव तसेच राहुरी व




अहिल्यानगर येथील मध्यम प्रकल्प बांधकाम उपविभागांमध्येही स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com